२३८

(१५३)

क्रमांक एकत्री/अनुसरण काम/९३
पुणे, दिनांक : २५/८/१९९३

सर्व सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी.

विषय :- अनुसरण काम पुर्ण करणे बाबत.
प्रलंबित.

एकत्रिकरण योजनेचे कामास शासनाने ४/१/९३ च्या पत्रान्वये स्थगिती दिल्यापासून, राज्यातील एकत्रिकरण योजनेचे काम स्थगित करण्यांत आले आहे. मात्र एकत्रिकरण योजनेवर आलेले तक्रारी अर्ज आणि राहिलेले शिलकी अनुसरण काम मात्र तात्काळ हाती घेऊन ते त्वर पूर्ण करणेबाबत वारंवार सूचना देऊनही त्यांत म्हणावा तेवढा उठाव झाल्याचे दिसून येत नाही.

अतएव आपणास असे सूचित करण्यांत येत आहे कि, आपल्या जिल्हयातील तक्रारी अर्जाचे कामी यापूर्वी पाठविलेल्या तक्त्यात माहिती भरून बिनचुक असल याबाबतची खात्री करुन, सादर करणेच्या सूचना देण्यात आल्या आहेतच आता त्याचप्रमाणे आपले जिल्हयात प्रलंबित असलेल्या शिलकी अनुसरण कामाची माहिती देखील खात्री करुन सादर करणेची आहे. ती माहिती सादर करताना -

[१] प्रख्यापन करणे

[२] हस्तांतरण प्रमाणपत्र

[३] नकाशे

[४] आकारबंद

[५] ३१-अ, खालील शुध्दीपत्रकाचे अनुसरणकाम

[६] ३२[१] खालील दुरूस्ती योजनेचे अनुसरण काम

[७] भाग योजना

[८] ताबे देणे / ताबे तपास

या कामाची खाली दिलेल्या तक्त्यांत माहिती बिनचुक भरून दि. ५-९-९३ पूर्वी मिळेल अशा बेताने सादर करावी. प्रत्येक शिलकी अनुसरण कामाची माहिती स्वतंत्र तक्त्यात सादर करणेची दक्षता संबंधित कार्यालय प्रमुखांनी घ्यावी. सादर केलेल्या माहितीव्यतिरिक्त आणखी माहिती शिल्लक नाही असे प्रमाणपत्र प्रत्येक तक्त्याचे शेवटी देण्यात यावे.

---२/-

तक्ता :-

| अ.नं. | गावाचे नांव तालुका जिल्हा | योजना मंजूर दिनांक | योजना कार्यान्वित दिनांक | गावचे एकूण गट/खाती | अनुसरण काम जोरा प्रलंबीत राहण्याची कारणे. | |
|---|---|---|---|---|---|---|
| -१- | -२- | -३- | -४- | -५- | -६- | -७- |

सदरची माहिती वेळीच सादर न करणाऱ्या संबंधित सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचेवर अत्यंत कडक कार्यवाही केली जाईल याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केली जाणारी नियत कालिक विवरणे वेळीच व ठरवून दिलेल्या दिनांकास सादर केली जात नाहीत ही बाब या कार्यालयाचे निदर्शनास आली आहे. त्यामुळे भविष्यात अशी माहिती वेळेवर प्राप्त न झाल्यास त्याबाबत संबंधित कार्यालय प्रमुख यांना जबाबदार ठरवून त्यांचेविरुध्द अत्यंत कडक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

उप संचालक भूमि अभिलेख कोकण प्रदेश, मुंबई यांचे कार्यालय
प्राप्त दिनांक : 2 SEP 1993
संकलन : Con
आवक क्रमांक : 974
कार्यविवरण क्र. : 5534

जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख [म.रा.] पुणे.
यांचेकरिता.

प्रत :- सर्व उपसंचालक भूमि अभिलेख / सर्व एकत्रीकरण अधिकारी / सर्व अधिक्षक भूमि अभिलेख [न.भू./पो.हि.] व एकत्रीकरण अधिकारी यांना माहिती व जरूर त्या कार्यवाहीसाठी.

------

मोरे १३/-